दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष २ रे || अंक २३६ || रविवार ११ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## श्रीवर्धन शासकीय कर्मचाऱ्यांकडून विविध मागण्यांसाठी निवेदन.

श्रीवर्धन / राजू रिकामे

दि. ९ ऑगस्ट २०२४ रोजी शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांकडून जुनी पेन्शन व विविध मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधण्याकरिता लक्षवेधी निवेदन श्रीवर्धनचे तहसीलदार महेंद्र वाकलेकर यांना देण्यात आले. या वेळी राज्य कर्मचारी



मध्यवर्ती संघटना ता. अध्यक्ष रविदास जाधव, सरचिटणीस पंकज पाटील, एस बी पाटील, नितीन घुगे, विकास बोंडले, मडवी, चव्हाण, दिवेकर यांच्या सह जि.प. कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच नगर पालिका, ग्राम पंचायत कर्मचारी व कंत्राटी कर्मचारी समन्वय समिती पदाधिकारी उपस्थित होते.

राज्यस्तरीय शासकीय कर्मचारी जुनी पेन्शन योजना तसेच सर्वच सरकारी विभागातील रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात असतांना देखील कर्मचारी पद भरती होत नाही.

तसेच कर्मचारी भरती ऐवजी कंत्राटी कर्मचारी नियुक्त करुन त्यांच्या कडून अत्यंत तुटपुंजा मानधनावर काम करुन घेतले जाते हे धोरण रद्द करुन त्यांच्या सेवा नियमीत करण्यात याव्यात. खासगीकरण धोरण रद्द करावे, बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारच्या सर्व विभागातील रिक्त पदे भरावी, अनुकंपा तत्वावरील भरती विनाअट करावी, शिक्षण क्षेत्रातील विना अनुदान धोरण बंद करावे, शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रशासकीय स्वरुपाचे प्रलंबित प्रश्न तात्काळ सोडवावे, ग्रामपंचायत कर्मचारी यांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडवावेत या व इतर अनेक मागण्यांबाबत सुध्दा सकारात्मक निर्णय घेऊन महाराष्ट्रातील शासकीय निमशासकीय कर्मचारी यांना न्याय द्यावे या करिता संघटनेच्या वतीने लक्षवेधी निवेदन देण्यात आले.

## शांतता व सलोखा टिकून राहण्यासाठी शांतता कमेटी व जनतेचे सहकार्य महत्वाचे : सपोनि नितीन मोहिते

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव

कोलाड पोलिस ठाण्यात शांतता कमेटीची सभा आयोजित



करण्यात आली.यावेळी मार्गदर्शन करतांना कोलाड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन

मोहिते यांनी सांगितले कि माझ्या कडून कोलाड मधील रस्त्यासाठी पुरेपूर पाठपुरावा केला जाईल,तसेच आपल्या हद्दीत जे परप्रांतीय आलेत त्यांच्या मालकांनी त्यांची पूर्णपणे माहिती घेऊन त्यांचे आधारकार्ड,पॅनकार्ड,पासबुक घेऊन अग्रीमेंट करून घ्या त्यांनी काही अनुचित प्रकार केला तर त्यांना पकडणे सोपे जाईल,गणपती सणासाठी वाहतुकीस अडथळा येऊ नये यासाठी व्यापारी वर्गानी येणारा माल रात्रीच्या वेळी उतरून घ्यावे, प्रत्येक सोसायटी मध्ये सी.सी टीव्ही कॅमेरा लावा.मी तुमच्या साठी तत्पर असेल परंतु समाजात शांतता व सलोखा टिकून राहण्यासाठी शांतता कमेटी व जनतेचे सहकार्य महत्वाचे आहे.ङ्ग गुरुवार दि. ८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५.०० वा. कोलाड पोलिस ठाण्यात येणारे सण व गणपती उत्सव यासाठी शांतता कमेटीची सभा कोलाड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन मोहिते यांच्या मार्गदर्शना खाली आयोजित करण्यात आली. सभेच्या सुरवातीला पोलीस अंमलदार नरेश पाटील यांनी उपस्थित शांतता कमेटीचे स्वागत केले.

यावेळी संदीप बाईत,अजय लोटणकर,सुशील ढवळे,विजय शिंदे,विराज शिंदे,स्वप्नील महाबळे,कल्पेश पिंपळकर,प्रफूल्ल बेटकर,गणेश वाचकवडे,मनोज सावरकर,गणेश महाडिक,कुमार लोखंडे,शौकत हाफीज,भरत सतांबेकर,संदेश लोखंडे,फाईक हाफीज,विजय सानप,किरण खंडागळे,दयाराम पवार,गुलाब वाघमारे,संतोष जाधव,पोलिस शिद,तसेच शांतता कमेटीचे असंख्य सदस्य उपस्थित होते.

शांतता कमेटीच्या सदस्य यांनी कोलाड बाजारपेठेतील गटारावरील झाकण बसवणे,गणपती उत्सवाच्या काळात पार्किंगची सोय करून देणे, सरकारी दवाखान्यात संध्याकाळी डॉक्टर उपलब्ध असणे, कोलाड हायस्कूल रोड वर शाळा भरताना व शाळा सुटल्यावर पोलीस बंदोबस्त असणे अशा महत्वाच्या विषयावर चर्चा केली शेवटी पोलीस अंमलदार नरेश पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## चिपळूण नागरीने २ हजार व्यवसायाचा टप्पा गाठून सहकारात नाव उंचावले– एस. बी. पाटील

**सहकार मेळावा व कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद हर घर तिरंगा अभियानात सहभाग देणारी चिपळूण नागरी एकमेव पतसंस्था**

चिपळूण

(ओंकार रेळेकर) चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेने २ हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा गाठून सहकारात नाव उंचावले आहे, ही बाब अभिमानास्पद असून यामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांचा ध्यास, कल्पकता आहे, अशा शब्दांत कौतुक करताना चिपळूण नागरीसह वाशिष्ठी डेअरीची उत्तरोत्तर प्रगती व्होवो, अशी सदिच्छा सेवानिवृत्त अप्पर आयुक्त तथा सहसचिव सहकार व पणन वस्त्रोद्योग मंत्रालय मुंबईचे एस. बी. पाटील यांनी चिपळूण नागरीच्या सहकार मेळावा व कार्यशाळा प्रसंगी व्यक्त केली.

हा मेळावा चिपळूण बहादूरशेखनाका येथील संस्थेच्या सहकार भवन सभागृहात झाला. यावेळी व्यासपीठावर चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण व्हाईस चेअरमन अशोक साबळे, संचालिका सौ. स्मिता चव्हाण, संचालक अशोक कदम, सोमा गुडेकर, प्रकाश साळवी, प्रमोद साळवी, प्रकाश पत्की, सत्यवान म्हामुनकर, राजेंद्र पटवर्धन, संचालिका श्रीमती नीलिमा जगताप, एडवोकेट नयना पवार आदी उपस्थित होते.यावेळी ते पुढे म्हणाले की, चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक व्यावसायिकता संभाळताना सामाजिक बांधिलकी देखील जपली आहे. तसेच कायदेशीर मार्गे वसुली हा पर्याय नाही कर्जदारांमध्ये इच्छाशक्ती असेल तर वसुली होऊन जाते. या संस्थेने वसुली पथकाची कधी गाडी फिरवली नाही. स्वतंत्र यंत्रणा राबवली नाही. सभासदांच्या मनात आपण कर्ज घेतले की हप्ते फेडले पाहिजेत, अशी भावना निर्माण केल्याने या संस्थेची कर्ज वसुली उत्तम आहे. तर संस्थेच्या ठेवीदेखील दिवसेंदिवस वाढत आहे चिपळूण नागरी आणि सभासदांचे नाते वेगळे आहे. ''आपली माणसं आपली संस्था''



या ब्रीदवाक्यप्रमाणे या संस्थेची यशस्वीपणे वाटचाल सुरू असून चिपळूण नागरी बरोबरच वाशिष्ठी डेअरीची वाटचाल कौतुकास्पद असून चिपळूण नागरी –सहकार व वाशिष्ठी डेअरी– खाजगी याची उत्तम सांगड घालण्यात आली असून या दोन्हींची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, अशी सदिच्छा यावेळी व्यक्त केली. चिपळूण नागरीच्या सिईओ सौ. स्वप्ना यादव रणरागिणी–तानाजी कवडे माजी सहनिबंधक लेखापरीक्षण महाराष्ट्र राज्य पुणेचे तानाजी कवडे यांनी आपल्या मनोगतात चिपळूण नागरीच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक केले. यामध्ये चिपळूण नागरीचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. संस्था वाढवायची असेल तर फक्त संचालकांचा सहभाग असून चालत नाही. त्यामागे त्या संस्थेच्या सीईओंचे महत्त्वाचे योगदान असते. सहकारामध्ये असे म्हटले जाते की, संस्थेचा संचालक हा संस्थेचा मेंदू आहे. तर सीईओ हा संस्थेचा कणा आहे. चिपळूण नागरीमध्ये एक रणरागिणी आहे. ती संस्थेचा यशस्वीपणे कारभार पाहत आहे. नेतृत्व आणि कर्तृत्व असल्याशिवाय कुठलेही कामकाज धडाडीने करता येत नाही, सिईओला अनेक जबाबदाऱ्या संभाळाव्या लागतात. त्या साऱ्या जबाबदाऱ्या या संस्थेच्या सीईओ यशस्वीपणे सांभाळीत आहेत, अशा शब्दात चिपळूण नागरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांचे कौतुक करताच उपस्थितीतांमधून टाळ्यांचा कडकडाट झाला. तसेच वाशिष्ठी डेअरीच्या वाटचालीचे देखील कवडे यांनी कौतुक केले. ङ्गङ्ग२ हजार कोटींचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण केल्याचा अभिमान– सुभाषराव चव्हाणङ्गङ्गचिपळूण नागरीचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांनी आपल्या मनोगतात संस्थेने आपल्या सर्वांना अभिमान वाटेल असा २ हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. भविष्यात देखील आपली साथ द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त करताना चिपळूण नागरीच्या २०२८ च्या संकल्पित आराखड्याचा आढावा घेतला. या आराखड्यात आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी होऊ, असा विश्वास व्यक्त केला. तसेच वाशिष्ठी डेअरीची अल्पावधीतच यशस्वी वाटचाल सुरू असून यातून जिल्ह्याची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचा प्रयत्न होत असल्याचे मत श्री. चव्हाण यांनी यावेळी व्यक्त करतांना चिपळूण नागरी– वाशिष्ठी डेअरी आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचं आहे, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करूया, असे आवाहन उपस्थितीतांना केले.ङ्गङ्गया सहकार मेळावा व कार्यशाळेचे सूत्रसंचालन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संस्थेच्या कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांनी करताना चिपळूण नागरीच्या वाटचालीचा आढावा घेतला. वाशिष्ठी डेअरीचे अध्यक्ष प्रशांत यादव यांच्यासह, लियाकत कासकर, सीताराम तटकरे, सीताराम खेतले, विलास कदम, नाना शिर्के, वैभव चव्हाण, गणपतराव शिंदे, गजानन भोसले आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चिपळूण नागरीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य अधिकारी व कर्मचारी वर्गाने मेहनत घेतली. ङ्गङ्गचौकटङ्गङ्गया मेळाव्यात ९ ते १५ ऑगस्ट पर्यंत हर घर तिरंगा हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबविण्याचा निर्णय मंत्रिमडळ बैठकीत घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सर्व समन्वयक सभासद व उपस्थितीतांना तिरंगा देऊन ''हर घर तिरंगा'' अभियानात सहभाग देणारी चिपळूण नागरी एकमेव पतसंस्था ठरली आहे. विशेष म्हणजे या तिरंग्याचे अनावरण करून उपस्थितीतांनी भारत माता की जय वंदे मातरम अशा घोषणा दिल्या. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सर्वांनी भरभरून कौतुक केले.

## जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून शासकीय माध्यमिक आश्रम शाळा कादवण येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

शेनाळे प्रतिनिधी : शासकीय माध्यमिक आश्रमशाळा कादवण, ता.मंडणगड जि.रत्नगिरी येथे दि.९ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक श्री.चव्हाण सर यांची एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे तहसील कार्यालय मंडणगड येथील मंडळ अधिकारी श्री. निलेश प्रल्हाद गोडगासे साहेब लाभले.कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे सरपंच श्री.राजेंद्र सोंडकर यांनी श्रीफळ वाढून केले.

बहुसंख्य पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात,सकाळी रॅली ने झाली त्यानंतर प्रतिमा पूजन करून आदिवासी नेते व क्रांतिकारक यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

ईशस्तवन, स्वागतगीत, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम याचे उत्तम सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले,

यामध्ये प्रामुख्याने आदिवासीं नृत्य डान्सचा समावेश होता.

विद्यार्थी गुणगौरव बक्षीस वितरण समारंभ झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष,शाळेचे मुख्याध्यापक श्री.चव्हाण सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या अध्यक्षीय भाषणात आजच्या आदिवासी दिनाचे महत्त्व समजावून सांगितले.

कादवण,तीडे,भोळवली,शेनाळे गावांचे पोलीस पाटील,उपस्थित मान्यवर,सर्व शिक्षक वृंद,कर्मचारी वृंद,

उपस्थित विद्यार्थ्यांचे श्री.सुतार सर यांनी आभार मानले.श्री.खळे सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक, अधीक्षक, अधीक्षिका,शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी तसेच पालक ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.





